## संक्षिप्त

### चारा छावण्या सुरू करण्याची मागणी

**हणेगाव, जि. नांदेड :** हणेगाव मंडळामध्ये यंदाच्या पावसाळ्यात आजवर कमी पाऊस झाला आहे. त्यामुळे पीक परिस्थिती बिकट आहे. दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नांसह जनावरांच्या चाऱ्यांचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यामुळे या भागात चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांनी तालुका प्रशासनाकडे केली आहे. हणेगाव मंडळातील शिळवणी, तुंबरपळी, वझर, खुतमापूर, लोणी, कोकलगाव, बिजलवाडी, कुन्मारपल्ली आदी गावांसह वाड्या, वस्त्या तांड्यावरील शेतकऱ्यांची खरीप पिके पावसाअभावी वाळून गेली आहेत. त्यामुळे पीक नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी. जनावरांसाठी चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी या भागातील शेतकऱ्यांनी तालुका प्रशासनाकडे केली आहे.

### दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी मोर्चा

**सेनगाव, जि. हिंगोली :** तब्बल महिनाभरापासून पाऊस गायब झाल्यामुळे तालुक्यातील अनेक गावांतील सोयाबीनसह खरीप पिके वाळून गेली आहेत. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे. चाराटंचाई भासत आहे. त्यामुळे तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात यावा. शेतकऱ्यांना दुष्काळग्रस्तांच्या सवलती लागू कराव्यात. नुकसानीचे पंचनामे करून आर्थिक मदत करावी, आदी मागण्यांसाठी शेतकरी, शेतमजुरांनी गुरुवारी (ता. २७) तहसील कार्यालयावर मोर्चा काढला होता.

# ऑनलाइन फेरफारमुळे वेळ आणि श्रम वाचणार

## जिल्हाधिकारी अरुण डोंगरे : नांदेड येथे विभागीय प्रशिक्षणवर्ग आणि चर्चासत्र

**नांदेड (प्रतिनिधी) :** डिजिटल इंडिया भूमिअभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम हा राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून याद्वारे शेतकऱ्यांना अचूक, संगणकीकृत, डिजिटल स्वाक्षरीयुक्त सात-बारा नमुने तसेच नमुना ८-अ उपलब्ध होणार आहे. फेरफार ऑनलाइन पद्धतीने होत असल्याने शेतकऱ्यांचा वेळ तसेच श्रम कमी होणार आहेत, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अरुण डोंगरे यांनी केले.

नांदेड, लातूर, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांसाठी डिजिटल इंडिया भूमिअभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम विभागीय स्तरावरील प्रशिक्षणवर्ग आणि चर्चासत्राचे आयोजन नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील डॉ. शंकरराव चव्हाण जिल्हा नियोजन भवन येथे करण्यात आले होते. या वेळी श्री. डोंगरे बोलत होते.

> **डिजिटल इंडिया भूमिअभिलेख आधुनिकीकरण प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक गावात चावडी वाचन पूर्ण करण्यात आले आहे. खातेदारांकडून प्राप्त आक्षेप, तक्रारी नुसार प्रत्येक संगणकीकृत गाव न. नं. ७/१२ मूळ हस्तलिखीत ७-१२ शी तंतोतंत जुळविण्याचे काम जिल्ह्यात ९९.९४ टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे.**
> **– संतोष वेणीकर,** निवासी उपजिल्हाधिकारी

या वेळी अप्पर जिल्हाधिकारी संतोष पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष वेणीकर, डिजिटल इंडिया भूमिअभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमाचे राज्य समन्वयक रामदास जगताप, गणेश देसाई, कृष्णा पाष्टे, नांदेड, लातूर, परभणी, निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी नांदेड, सहजिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, सर्व तालुक्याचे तहसीलदार, नायब तहसीलदार तथा डीबीए, मंडळ अधिकारी, मास्टर ट्रेनर्स यांची या वेळी उपस्थिती होती.

श्री. डोंगरे पुढे म्हणाले, या प्रकल्पाअंतर्गत नांदेड जिल्ह्याची कामगिरी चांगली असून किनवट तालुक्यातील खंबाळा वगळता जिल्ह्यातील सर्व गावांचे शंभर टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे. ७-१२ नमुने दुरुस्ती तसेच प्रत्येक प्रकारचा फेरफार ऑनलाइन पद्धतीने नोंदविण्यासाठी जमाबंदी आयुक्त कार्यालयाद्वारे विविध प्रकारच्या आज्ञावली विकसित केलेल्या आहेत. त्यात नवीन सुविधा वेळोवेळी विकसित करण्यात येतात. विशेष म्हणजे नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यांपैकी १६ तालुक्यांचे रिएडीटचे काम किनवट तालुक्यातील खंबाळा वगळता शंभर टक्के पूर्ण करण्यात आले. या वेळी संगणकीय अज्ञावली वापराची कार्यपद्धतीबाबत व प्रत्यक्ष अंमलबजावणीतील येणाऱ्या अडीअडचणीबाबतचे मार्गदर्शन सकाळच्या सत्रामध्ये करण्यात आले. अडचणी शंकानिरसन करण्यात आले. लातूर, नांदेड, हिंगोली, परभणी येथील अधिकारी, कर्मचारी आदी प्रशिक्षणामध्ये सहभागी झाले होते.

# मजुरीवाढीच्या नव्या कराराशिवाय हाती कोयता घेऊ नका

## शिवसंग्रामचे संस्थापक विनायक मेटे ; ऊसतोड कामगारांचा मेळावा

**बीड (प्रतिनिधी) :** पूर्वी तीन वर्षांचा करार आता पाच वर्षांचा केला. तो करार रद्द करून तीन वर्षांचा करार झाल्याशिवाय हातात कोयता घेऊ नका, असे आवाहन शिवस्मारक समितीचे अध्यक्ष तथा शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष विनायक मेटे यांनी केले.

शिवसंग्रामचा ऊसतोड मजूर मेळावा शुक्रवारी (ता. २८) पाडळशिंगी (ता. गेवराई) येथे झाला.

श्री. मेटे म्हणाले, की ऊसतोडणीसाठी यंत्राला मिळणाऱ्या प्रतिटन ४०० रुपये भाव मजुरांनाही मिळावा. तसेच मुकादमांचे कमिशन ३६ टक्के करावे. हंगामी वसतिगृहासाठी प्रत्येक वर्षी प्रत्येक जिल्ह्यात १५ कोटी रुपये खर्च होतात. त्याऐवजी ऊसतोड मजुरांच्या पाल्यांसाठी प्रत्येक तालुक्यात कायमस्वरूपी वसतिगृह उभारावे ; तसेच मजुरांचा विमा उतरावा. ऊसतोडणी मजुरांसाठी शिवसंग्रामच्या संघटनेची घोषणा करून प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेऊ. मेळाव्याला ऊसतोड मजूर व मुकादमांची मोठी उपस्थिती होती.



**बीड : पाडळशिंगी (ता. गेवराई) : येथे शुक्रवारी शिवसंग्रामचा ऊसतोड कामगारांचा मेळावा झाला. या मेळाव्यात विनायक मेटे यांच्या हाती कोयता देऊन सत्कार करण्यात आला. (छायाचित्र : कृष्णा शिंदे, बीड)**

# इटलापूर येथे बालविकास कार्यशाळा

**परभणी (प्रतिनिधी) :** वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रामीण कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत इटलापूर (ता. परभणी) येथे बालकांचा विकसांक आणि शालेय संपादणूक वृद्धिंगत करण्यासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. बालविकास शास्त्रज्ञ व मानव विकास विभागप्रमुख प्रा. विशाला पटनम यांनी बालकांचा सर्वांगीण विकास घडवण्यासाठी त्यांची काळजी कशी घ्यावी, बालकांच्या वाढांकाचे महत्त्व व त्याचे मूल्यमापन करण्याची शास्त्रोक्त पद्धती, विद्यार्थ्यांमध्ये कल्पनाशक्ती कशी वाढवावी, त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे संवर्धन याबाबत प्रात्याक्षिकासह व्याख्यान दिले. या वेळी उपस्थित बालकांपैकी उत्कृष्ट वाढांक असलेल्या बारा विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना बेस्ट चाइल्ड, बेस्ट पेरेंट्स् अॅवार्ड प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

सकाळ अॅग्रोवन — आयोजित
चव्हाळ अॅग्रो सर्व्हिसेस कृषी सल्ला-सेवा-मार्गदर्शन — प्रायोजित
सकाळ अॅग्रोवन संवाद
**'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद**
**कार्यक्रम वेळापत्रक**
**रविवार, ३० सप्टेंबर २०१८ रोजी**
**विषय –** हळद पीक व्यवस्थापन
**वक्ते – डॉ. आनंद गोरे** (वरिष्ठ शास्त्रज्ञ, व.ना.म.कृ.वि. परभणी)
**डॉ. अनंत बडगुजर** (किटक शास्त्रज्ञ, व.ना.म.कृ. वि.परभणी)
**श्री. प्रभाकर चव्हाळ** (कृषी पदव्युत्तर-प्रगतशील युवा शेतकरी, मोरेगाव)
**स्थळ –** ओमप्रकाश बापुराव चव्हाळ यांचे फार्म हाऊस, मु. पो. मोरेगाव, ता. सेलू, जि. परभणी, **वेळ –** सकाळी १० वा.
**या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.**

# केंद्रीय कापूस संशोधन संस्थेच्या शास्त्रज्ञांची परभणीत प्रक्षेत्र भेट

**परभणी (प्रतिनिधी) :** नागपूर येथील केंद्रीय कापूस संशोधन संस्थेच्या शास्त्रज्ञांच्या पथकाने जिल्ह्यातील विविध गाव शिवारातील शेतकऱ्यांच्या कपाशीच्या शेतावर जाऊन सद्यःस्थितीतील कपाशीच्या पिकांची पाहणी केली.

जिल्ह्यातील कपाशीवर ऑगस्ट महिन्यात मोठ्या प्रमाणावर गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळून आले होते. त्यामुळे सद्यःस्थितील कपाशीची पिकांच्या पाहणी करण्यासाठी नागपूर येथील केंद्रीय कापूस संशोधन संस्थेतील शास्त्रज्ञ डॉ. विश्लेष नगरारे, डॉ. राकेश कुमार यांचे पथक मंगळवारी (ता. २५) जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते.या पथकाने कात्नेश्वर (ता. पूर्णा), रहाटी, असोला, पान्हेरा (ता. परभणी), ताडबोरगाव (ता. मानवत) या गावांच्या शिवारातील शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन कपाशीच्या पिकांची पाहणी केली. कृषी विभाग, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान यांनी बोंड अळी नियंत्रणासाठी राबविलेल्या जनजागृती मोहिमेमुळे बोंड अळी नियंत्रणात आल्याचे आढळून आले. एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीने बोंड अळीचे नियंत्रण करावे, असे आवाहनही शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांना केले. या वेळी प्रत्येक ठिकाणच्या कपाशीच्या शेतामधून २० बोंड तपासणीसाठी नागपूर येथे नेण्यात आली. प्रक्षेत्र भेटीच्या वेळी मंडळ कृषी अधिकारी कैलास गायकवाड, के. एम. जाधव, पर्यवेक्षक आर. के. सय्यद, ए. एल. कदम, जी. आर. शिंदे, एस. एस. वाघमोडे, कृषी सहायक स्वप्नील शिंदे, अनिल वडजे, प्रेम जाधव, पी. पी. चव्हाण, के. बी. पाटील, जी. डी. वैद्य आदी उपस्थित होते. या पथकाने नांदेड जिल्ह्यातील मालेगाव येथील कपाशीची पाहणी केली.



**रहाटी, जि. परभणी : नागपूर येथील केंद्रीय कापूस संशोधन संस्थेतील शास्त्रज्ञ डॉ. विश्लेष नगरारे, डॉ. राकेश कुमार यांनी कपाशीच्या पिकांची पाहणी केली. या वेळी कृषी अधिकारी कैलास गायकवाड, आर. के. सय्यद आदींसह शेतकरी.**